MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : १३ अंक : ५ पाने : १२ ■ ऑगस्ट-सप्टेंबर २०१९ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in



**पराग जैन नानोटिया** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान व आधुनिकीकरणावर भर देणे गरजेचे आहे. महापारेषणसारख्या पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या कंपनीस आधुनिकीकरणावर काम करण्यास खूप संधी आहे. सर्वतोपरी विचार केला असता असे दिसते की, महापारेषणच्या पायाभूत सुविधांमध्ये (उपकेंद्र, तारमार्ग) फार मोठा टप्पा गाठण्यास कंपनीस यश आले आहे. यापुढे त्यामध्ये आधुनिकीकरण आणण्याचे आव्हान कंपनीसमोर आहे.

- **आधुनिकीकरणावर भर द्यावा**
- **कामांचा आढावा घ्या**
- **वेळेत प्रकल्प पूर्ण करा**
- **सांघिक भावना कायम ठेवा**

कंपनी फार मोठ्या प्रमाणावर ईआरपीच्या तसेच सबस्टेशन ऑटोमेशनच्या (स्काडा अंमलबजावणी) माध्यमातून आधुनिकीकरणावर प्रयत्न करत आहे. तसेच ६६ के. व्ही. उपकेंद्र अद्ययावत करून वरच्या पातळीवर नेण्याचे प्रयत्न करत आहे. जीआयएस सबस्टेशनची निर्मिती, Assets Management, Remote Controlling, Drone Based Patrolling असे अनेक उपक्रम कंपनी प्राधान्यक्रमावर विचारविनिमय करून अंमलबजावणी करण्यास प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर जुनी झालेली महापारेषण यंत्रणा त्यास अद्ययावत करण्याचे सुध्दा प्रयत्न युध्दपातळीवर सुरु आहेत. मला आशा आहे की, पुढील काही वर्षात आधुनिकीकरणाचा फार चांगला टप्पा पार पाडण्यास आपण यशस्वी होऊ.

महापारेषण कंपनीच्या कामगिरीचा आलेख दरवर्षी चढता असलेला आपण पाहतो. मात्र, कंपनीत होणाऱ्या दुर्घटना व त्यामधील जीवितहानी झालेली आहे ती कोणत्याही परिस्थितीत आपल्याला टाळणे गरजेचे आहे. किंबहुना दुर्घटनाविरहित यंत्रणा सुसज्ज व देखभाल ठेवणे याकरिता आपण सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. आजमितीस फार चांगली सुरक्षा यंत्रणा आपण महापारेषणमध्ये राबवित आहोत. परंतु, तरीही दुर्घटना का घडतात, याबाबत सखोल अभ्यास करून त्यातील त्रुटींवर आपल्या सर्वांना उपाययोजना करणे आवश्यक आहे. किंबहुना प्रत्येक विभाग, मंडळ व परिमंडल यांनी सुरक्षा दृष्टिकोनातून सततचा आढावा घेऊन आपली प्रणाली दुर्घटना प्रतिबंधित करण्याचे ध्येय ठेवणे गरजेचे आहे.

आज प्रशासन कालबध्द पध्दतीत परिमंडळाची आढावा बैठक घेत आहे. त्या बैठकीतून यंत्रणेला चालना देण्यास मदत होत असलेली पाहत आहे. प्रत्येक आढावा बैठकीतून आपल्याला कंपनीने दिलेल्या जबाबदारीचे प्रकटीकरण प्रशासनासमोर करावयाची एक चांगली संधी त्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयांना प्राप्त झालेली आहे. या आढावा बैठकीतून आपण कुठे मागे आहोत? तसेच कोणत्या बाबींवर आपण चांगली कामगिरी करत आहोत तसेच क्षेत्रीय कार्यालयांना कोणत्या प्रकारची प्रशासनातर्फे मदत किंवा साधनसामुग्रीची गरज आहे ते लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना करता येते. माझी अपेक्षा आहे की, अशा प्रकारची पुनरावलोकन व परीक्षण आढावा बैठक प्रत्येक वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्या अंतर्गत असलेल्या कनिष्ठ कार्यालयांशी घेतल्यास फार चांगल्या प्रकारचा फरक कंपनीची एकंदरीत कार्यक्षमता वाढविण्यास होईल.

कंपनीने नियोजित केलेले प्रकल्प वेळेत व नियोजित खर्चात पूर्ण करणे सर्व प्रकल्प अभियंत्यांची जबाबदारी आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्यात आपल्यासारख्या पायाभूत सुविधा देणाऱ्या कंपनीस अनेक अडचणी येणार, हे साहजिकच आहे. मात्र, त्या अडचणींवर मात करण्याचेच कौशल्य आपल्या अभियंत्यांकडे असणे गरजेचे आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योग्य ते मार्गदर्शन करून आपला अनुभव आपल्या चमूस सांगणे गरजेचे आहे. प्रकल्पांमध्ये आऊट ऑफ बॉक्स विचार तसेच सर्जनशीलतेचा (Creativity) वापर करून प्रकल्पातील अडचणींवर मात करावी लागते. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांचे विषय, अडचणी, आव्हाने वेगवेगळी असतात. त्यांच्यावर मात करण्यासाठी उपाययोजनासुध्दा स्थानिक पातळीवर शोधावी लागते. प्रकल्पांमध्ये त्यामुळे आपल्याला प्रत्येक समस्या वेगवेगळ्या माध्यमातून बघणे गरजेचे राहते.

संचलन व सुव्यवस्थेमध्ये नियोजनाचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कंपनीने ठरवून दिलेल्या नियोजनात्मक कामाच्या अंमलबजावणीमुळे संचलन व सुव्यवस्था उत्तम पध्दतीने राखण्यास मदत होते. कोणत्याही पध्दतीचा व्यत्यय व अनियमितता आपल्याला अनेक अडचणींना आमंत्रण देऊ शकते. त्यासाठी प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्याने नियमबध्द आढावा घेऊन नियोजनात्मक कामे पार पाडतील, याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**देऊळवाडी (जि. अहमदनगर) :** कर्जत तालुक्यातील देऊळवाडी येथे महापारेषणच्या नियोजित ४००/२२० के. व्ही. उपकेंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी बोलताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, शेजारी डावीकडून नगराध्यक्षा श्रीमती प्रतिभाताई भैलुमे, माजी मंत्री श्री. बबनराव पाचपुते, पणन व वस्त्रोद्योगमंत्री श्री. राम शिंदे, खासदार डॉ. सुजय विखे-पाटील, कर्जत पंचायत समितीच्या सभापती श्रीमती साधना कदम.

## देऊळवाडी (कर्जत) येथील उपकेंद्राचे भूमिपूजन

# राज्यात एक शेतकरी, एक ट्रान्सफॉर्मर योजना

*टीम महापारेषण, अहमदनगर*

``राज्यात एक शेतकरी, एक ट्रान्सफॉर्मर ही योजना लवकरच सुरू करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शाश्वत वीज मिळेल.`` असे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

देऊळवाडी ता. कर्जत जि. अहमदनगर येथे महापारेषणच्या नियोजित ४००/२२० के. व्ही. उपकेंद्राचे भूमिपूजन श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व वस्त्रोद्योगमंत्री श्री. राम शिंदे उपस्थित होते.

यावेळी खासदार डॉ. श्री. सुजय विखे-पाटील, माजी मंत्री श्री. बबनराव पाचपुते, कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती प्रतिभाताई भैलुमे, उपनगराध्यक्ष श्री. नामदेव राऊत, कर्जत पंचायत समितीच्या सभापती श्रीमती साधना कदम, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री. श्रीधर पवार, महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके, अउदा प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव, अउदा स्थापत्य व बांधकाम मंडळ, नाशिक येथील अधीक्षक अभियंता श्री. शरद लोखंडे, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, महसूल विभागाचे अधिकारी, महापारेषण, महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तसेच देऊळवाडी-सिद्धटेक पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे पुढे म्हणाले की, ``उद्योजक, शेतकऱ्यांना बळ देणारा हा शाश्वत प्रकल्प आहे. सर्व शेतकऱ्यांना वीजपंप मिळेल. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र सुजलाम-सुफलाम होत आहे. सुमारे ३६८ कोटींचा हा प्रकल्प सर्वात मोठा आहे. कर्जत तालुक्यात २१२ कोटींची कामे केली आहेत. आगामी तीन वर्षात ८०४ कोटींची कामे करणार आहे. २०३५ पर्यंत शाश्वत वीजपुरवठा होईल. शेतकऱ्यांना १ रुपया ६० पैशांनी वीजपुरवठा देण्यात येतो. सुमारे ४२ लाख शेतकऱ्यांना वीजपुरवठा दिला आहे. आगामी काळात शेतकऱ्यांना मजबूत करणार आहे. समूह पडीक जमिनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सौरऊर्जा देणार आहे.``

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नीलेश दिवटे यांनी केले तर आभार कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. विनोद ढोरे यांनी मानले.



**देऊळवाडी (जि. अहमदनगर) :** कर्जत तालुक्यातील देऊळवाडी येथे महापारेषणच्या नियोजित ४००/२२० के. व्ही. उपकेंद्राच्या कोनशिला अनावरणप्रसंगी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, शेजारी नगराध्यक्षा श्रीमती प्रतिभाताई भैलुमे, माजी मंत्री श्री. बबनराव पाचपुते, पणन व वस्त्रोद्योगमंत्री श्री. राम शिंदे, खासदार डॉ. सुजय विखे-पाटील, पं. स. सभापती श्रीमती साधना कदम.

- ४००/२२० के. व्ही. कर्जत उपकेंद्राच्या उभारणीमुळे ४०० के. व्ही. बाभळेश्वर उपकेंद्रावरील बराचसा भार कमी होईल.
- नवीन ४००/२२० के. व्ही. कर्जत उपकेंद्रातून तीन जिल्ह्यातील पाच उपकेंद्रांना २२०/१३२/३३ के. व्ही. दाबाने वीजपुरवठा करण्यात येईल.
  अ) अहमदनगर जिल्ह्यातील २२० के. व्ही. भोसे (बेलवंडी) व २२० के. व्ही. अहमदनगर
  ब) पुणे जिल्ह्यातील २२० के. व्ही. भिगवण व २२० के. व्ही. कुरकुंभ
  क) सोलापूर जिल्ह्यातील २२० के. व्ही. जेऊर
- २२० के. व्ही. विजेच्या वाहिन्यांची लांबी कमी होईल. तसेच योग्य दाबाने अखंडित वीजपुरवठा करता येईल.
- अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत, श्रीगोंदा व जामखेड या तालुक्यामध्ये भविष्यात येणारी विजेची मागणी पूर्ण करण्यास मदत होईल.
- अहमदनगर, सोलापूर व पुणे जिल्ह्यातील सुमारे ५ लाख वीज ग्राहकांना याचा लाभ होणार आहे.
- या उपकेंद्राच्या यशस्वी उभारणीनंतर या परिसरातील २२० के. व्ही. भोसे (बेलवंडी), २२० के. व्ही. अहमदनगर तसेच जेऊर, कुरकुंभ, भिगवण येथील उपकेंद्रांनासुद्धा योग्य दाबाने व अखंडित वीजपुरवठा होण्याच्या दृष्टीने फायदा होणार आहे.



### महापारेषण अपडेट

यावर्षी १२ नवीन अ.उ.दा. उपकेंद्रे





## शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार : ऊर्जामंत्री

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील भाजप सरकारने शेतकऱ्यांसाठी घेतलेला हा सकारात्मक निर्णय आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीजपुरवठा होईल. या शासनाच्या काळात शेतकऱ्यांनी दिवसा विजेची मागणी केली होती. त्या मागणीची पूर्तता या योजनेद्वारे शासन पूर्ण करीत असल्याचे दिसत असल्याचे मत ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले आहे.

■ ७५ हजार कृषी पंप आस्थापित करणार ■

# मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना दुसरा व तिसरा टप्पा राबविण्यास मान्यता

■ *टीम महावितरण/टीम महापारेषण*

मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेच्या पहिल्या टप्प्यास शेतकऱ्यांचा मिळणारा चांगला प्रतिसाद लक्षात घेता या योजनेचा दुसरा व तिसरा टप्पा राज्यात राबविण्यासाठी राज्याच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या योजनेच्या अंमलबजावणीत ७५ हजार कृषी पंप आस्थापित करण्यात येणार आहेत. त्यासाठी लागणाऱ्या १५३१ कोटी रुपयांच्या प्रकल्प खर्चालाही मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली.

मुख्यमंत्री सौर कृषी पंप टप्पा २ व ३ ही पूर्णत: राज्य शासनाची योजना राहणार असून ही योजना प्रत्यक्ष सुरु झाल्यापासून १८ महिन्यात राबविण्यात येणार आहे. टप्पा २ व ३ मध्ये शेतकऱ्यांना ३ अश्वशक्ती, ५ अश्वशक्ती व ७.५ अश्वशक्ती डीसी सौर कृषी देण्याचा निर्णय झाला आहे. या योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करणे शक्य होणार आहे. तसेच कृषीपंप जोडणीसाठी लागणाऱ्या खर्चात व शासनाद्वारे सबसिडीपोटी देण्यात येणाऱ्या अनुदानात बचत व्हावी या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली होती.

राज्यातील शेतकऱ्यांना कृषी वापरासाठी पारेषण विरहित १ लक्ष सौर कृषीपंप तीन टप्प्यात उपलब्ध करुन देण्याचा प्रस्तावाला १६ ऑक्टोबर २०१८ च्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली होती. या योजनेच्या



पहिल्या टप्प्यात २५ हजार नग सौर कृषी पंप आस्थापित करण्याचे ठरले. त्यानुसार कारवाई सुरु आहे. शासन, शेतकरी व महावितरण यांना होणारा लाभ लक्षात घेता दुसरा व तिसरा टप्पा एकत्रित राबविण्यास महावितरणने विनंती केली होती.

सौर कृषी पंपांच्या योजनांचा मागील अनुभव व मागणी तसेच भौगोलिक परिस्थिती व किंमतीचा विचार करुन सन २०१९-२०२० करिता असणाऱ्या ७५ हजार सौर कृषी पंपांपैकी ७० टक्के पंप हे ३ अश्वशक्ती, २० टक्के पंप ५ अश्वशक्ती तर ७.५ अश्वशक्ती (सर्व डीसी) ७५०० नग असे एकूण ७५ हजार सौर कृषीपंप राहणार आहेत. या योजनेअंतर्गत सर्वसाधारण लाभार्थांकरिता सौर कृषी पंपाच्या निविदा किंमतीच्या १० टक्के, अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांचा ५ टक्के हिस्सा राहील.

या योजनेसाठी सर्वसाधारण अर्जदारांचा हिस्सा ११८.३६ कोटी व अनुसूचित जातीच्या अर्जदारांसाठी राज्य शासनाच्या हिस्सा १६८ कोटी तर अनुसूचित जमातीच्या अर्जदारांसाठी राज्य शासनाचा एकूण हिस्सा १३३ कोटी एवढा राहील. या योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांकडे पारंपरिक पध्दतीने विद्युत जोडणी झालेली नसणे आवश्यक आहे.

ज्या शेतकऱ्याकडे ५ एकरपर्यंत शेतजमीन आहे, त्या शेतकऱ्याला ३ अश्वशक्ती, ५ एकरपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या शेतकऱ्याला ५ अश्वशक्ती तर ५ एकरपेक्षा जास्त शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्याला भौगोलिक परिस्थितीनुसार पंपासाठी मागणी विचारात घेता ७.५ अश्वशक्तीचा पंप दिला जाईल.

राज्यातील पारंपरिकरित्या विद्युतीकरण न झालेले शेतकरी, विद्युतीकरणासाठी वन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसलेले शेतकरी, महावितरणकडे पैसे भरुन कनेक्शन प्रलंबित असलेले शेतकरी, नजीकच्या काळात विद्युत जोडणी मिळणे शक्य नसलेले शेतकरी, शासनाच्या धडक सिंचन योजनेअंतर्गत लाभ घेतलेले शेतकरी यांना या योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात येईल. शेततळे, विहीर, बोअरवेल, बारमाही वाहणारी नदी-नाले यांच्या शेजारील शेतजमीन धारक शेतकरी या योजनेसाठी पात्र राहतील.



**अमरावती :** महापारेषणच्या `प्रकाश सरिता` या नूतन इमारतीचे उद्घाटन करताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे. शेजारी कृषीमंत्री डॉ. अनिल बोंडे, खासदार श्रीमती नवनीत राणा, श्रीमती संध्याताई टिकले, श्री. दिलीप घुगल, श्री. भाऊराव राऊत व अन्य मान्यवर.

## महापारेषणच्या प्रकाश सरिता इमारतीचे उद्घाटन

# विजेशिवाय देशाचा विकास नाही : ऊर्जामंत्री

*टीम महापारेषण, अमरावती*

''वीज आहे, तर राष्ट्र आहे. विजेशिवाय देशाचा विकास शक्य नाही. वीज नसेल तर विकास थांबेल म्हणून वीज देणे ही शासनाची जबाबदारी आहे'', असे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

वेलकम पॉईंट, पॉवर हाऊस परिसरात महापारेषणच्या नूतन इमारत `प्रकाश सरिता`चे उद्घाटन व सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्याच्या १२ आठवड्याच्या प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी श्री. चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषीमंत्री डॉ. अनिल बोंडे होते. याप्रसंगी खासदार श्रीमती नवनीत राणा, उपमहापौर श्रीमती संध्याताई टिकले, नगरसेविका श्रीमती सुरेखा लुंगारे, महावितरण प्रादेशिक संचालक श्री. दिलीप घुगल, महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. भाऊराव राऊत, श्री. सतीश अणे, महावितरणच्या मुख्य अभियंता श्रीमती सुचित्रा गुजर, अधीक्षक अभियंता श्री. दिलीप खानंदे उपस्थित होते.

महापारेषणने मागील पाच वर्षात वीज यंत्रणा सक्षमीकरणात अनेक भरीव कामे केली. ८५ कि. मी. लांबीची मध्यप्रदेशातून वीजवाहिनी टाकून धारणीत १३२ के. व्ही. चे उपकेंद्र उभारले. त्यामुळे अतिदुर्गम भागातही वीज पोहोचविणे शक्य झाले. अमरावती विभागात महावितरणच्या माध्यमातून मागील पाच वर्षात ७०० कोटी रुपये खर्चुन ३४ उपकेंद्रे उभारण्यात आली. यामुळे जिल्ह्यातील ३० हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना वीजजोडणी देण्यात आली.

बेरोजगार अभियंत्यांना कॉन्ट्रॅक्टरचे लायसन्स देण्याची प्रक्रिया आता जिल्हा पातळीवरच पूर्ण होणार असल्याने बेरोजगार अभियंत्यांना ७५ लाख रुपयांपर्यंतची कामे मिळणार आहेत, असे श्री. चंद्रशेखर बावनकुळे यंनी सांगितले.



**अमरावती :** महापारेषणच्या `प्रकाश सरिता` या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे. शेजारी कृषीमंत्री डॉ. अनिल बोंडे, खासदार श्रीमती नवनीत राणा, श्रीमती संध्याताई टिकले, श्रीमती सुरेखा लुंगारे यांच्यासह अन्य मान्यवर.

### ऊर्जा विभागाचे कार्य प्रशंसनीय

महावितरणने पायाभूत सुविधेत केलेल्या भरीव कामामुळे आणि ग्राहक सुविधेतील बदलामुळे महावितरण विरोधात होत असलेली आंदोलने ही कमी झाली आहेत, असे कृषीमंत्री डॉ. अनिल बोंडे म्हणाले. ऊर्जा विभागाव्दारे बेरोजगार अभियंत्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना कॉन्ट्रॅक्टरचे लायसन्स देण्याचे काम हे प्रशंसनीय असल्याचे मत खासदार श्रीमती नवनीत राणा यांनी व्यक्त केले.



### महापारेषण अपडेट

यावर्षी ४,१६९ एम.व्ही.ए. ची वाढ





**मुंबई :** महावितरणच्या Digital MSEDCL-Making electricity distribution smarter & consumer centred" या पुस्तिकेचे तसेच ग्राहकोपयोगी 'सिटीझन चार्टर'चे प्रकाशन करताना केंद्रीय वीज नियामक आयोगाचे अध्यक्ष श्री. पी.के. पुजारी, मुख्य नियामक श्री. सुशांत चटर्जी, राज्य वीज नियामक आयोगाचे अध्यक्ष श्री. आनंद कुलकर्णी, सदस्य श्री. मुकेश खुल्लर, श्री. आय.एम. बोहरी, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, पॉवर सिस्टीम कॉर्पोरेशनचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. केव्हीएस बाबा व इतर मान्यवर.

### वीज नियामक आयोगाने घेतली कार्यशाळा

# वीज क्षेत्रातील नियम व विनियमनात होणार बदल

*टीम महावितरण, मुंबई*

शाश्वत व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा करण्यासाठी सध्याच्या वीजयंत्रणा व त्याच्या व्यवस्थापनामध्ये होणारे बदल पाहता विजेच्या 'नियम व विनियमनात'ही अनुषंगिक बदल करणे गरजेचे आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय व राज्य वीज नियामक आयोगाकडून संयुक्तरित्या महाराष्ट्रातील सर्व वीज कंपन्यांसोबत कार्यशाळा घेण्यात आली.

देशात महाराष्ट्र राज्य हे विजक्षेत्रात अग्रणी असून मागील काही वर्षांत महावितरणने यामध्ये सकारात्मक बदल करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली आहे. या पार्श्वभूमीवर नव्याने होणाऱ्या 'Real Time Market' (RTM) आणि 'Security Constrained Economic Dispatch' (SCED) या दोन विनियमांबाबत केंद्रीय वीज नियामक आयोग व महाराष्ट्र राज्य् विद्युत नियामक आयोगाने महाराष्ट्रातील वीज कंपन्यांची संयुक्त कार्यशाळा आयोजित केली होती. दोन्ही विनियमनाबाबत त्यांनी वीज कपन्यांच्या सूचना जाणून घेतल्या.


महावितरणने गेल्या तीन वर्षात विविध ग्राहकोपयोगी सेवा डिजिटल माध्यमातून उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याबद्दलची माहिती दर्शविणाऱ्या Digital MSEDCL-Making electricity distribution smarter & consumer centred" या पुस्तिकेचे तसेच ग्राहक उपयोगी 'सिटीझन चार्टर'चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यशाळेला केंद्रीय वीज नियामक आयोगाचे अध्यक्ष श्री. पी.के. पुजारी व मुख्य नियामक श्री. सुशांत चटर्जी, राज्य वीज नियामक आयोगाचे अध्यक्ष श्री. आनंद कुलकर्णी, सदस्य श्री. मुकेश खुल्लर व श्री. आय.एम. बोहरी, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, पॉवर सिस्टीम कॉर्पोरेशनचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. केव्हीएस. बाबा, महावितरणचे संचालक (वाणिज्य) श्री. सतीश चव्हाण व संचालक (वित्त) श्री. जयकुमार श्रीनिवासन यांचेसह महानिर्मिती, बेस्ट, टाटा पॉवर, अदानी आदी वीज कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



## महापारेषण अपडेट

यावर्षी १,०८६ स.कि.मी. अ.उ.दा. वाहिन्या





**मुंबई :** व्हीजन-२०३० या पुस्तकाचे प्रकाशन करताना ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, शेजारी प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. अरविंद सिंह, होल्डिंग कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, उपसचिव श्री. प्रशांत बडगेरी, मा.ऊर्जामंत्र्यांचे खासगी सचिव श्री. मनोहर पोटे, ओएसडी श्री. मिलिंद चोपडे व अन्य.



## सत्कार कार्याचा

**मुंबई :** ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. अरविंद सिंह यांची अतिरिक्त मुख्य सचिवपदी बढती मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया. शेजारी होल्डिंग कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक. डावीकडून संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्री. श्रीकांत राजूरकर.

### १५ प्रशिक्षणार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

# औरंगाबाद येथे महिला तक्रार निवारण समिती प्रशिक्षण

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

औरंगाबाद परिमंडळाच्या वतीने आयोजिलेल्या महिला तक्रार निवारण समिती प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन महिला व बालविकास विभागाच्या जिल्हाप्रमुख श्रीमती फरिदा अत्तार यांच्या हस्ते झाले. यामध्ये १५ प्रशिक्षणार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून प्रा. डॉ. अपर्णा कोतापल्ले व ॲड. नेहा कांबळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) (प्रभारी) श्री. चंद्रशेखर बोराडे उपस्थित होते.

प्रा. डॉ. अपर्णा कोतापल्ले यांनी विषयाची गरज व अपेक्षा याबाबत चर्चा केली. विशाखा समिती स्थापनेच्या इतिहासासोबतच विधीविषयक ज्ञानाची गरज विषद केली. समितीच्या सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल अधिकार व कर्तव्याबाबत जाणीव करून दिली. दुपारच्या सत्रात ॲड. नेहा कांबळे यांनी मूळ कायदा सर्वांसमोर मांडून समिती सदस्यांना जागरूक केले. कार्यक्रमाला औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाळके यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक श्रीमती मंजूषा दुसाने यांनी तर सूत्रसंचालन श्री. वाणी यांनी केले.



## महापारेषण अपडेट

भांडवली खर्चाच्या कामांवर ११२२ कोटी खर्च



■ कर्मचारी संघटनांकडून निर्णयाचे स्वागत ■

# वीज कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ३२.५० टक्के वाढ

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण/ टीम महानिर्मिती, मुंबई*


राज्यातील महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना ३२.५० टक्के वेतनवाढ मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे त्याचा लाभ राज्यातील सुमारे एक लाख वीज कर्मचाऱ्यांना होणार आहे. ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी वीज कर्मचाऱ्यांना भरघोस पगारवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. तिन्ही कंपन्यांच्या कर्मचारी संघटनेने निर्णयाचे स्वागत करत ऊर्जामंत्र्यांचे आभार मानले आहेत.


महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तिन्हीही कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना पूर्वीच्या मूळ वेतनाच्या ३२.५० टक्के तर विविध भत्त्यांमध्ये १०० टक्के वाढ करण्यात येणार आहे. ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी या महत्त्वपूर्ण विषयावर पुढाकार घेत कर्मचाऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला आहे. तिन्ही कंपन्यांच्या प्रशासनासोबत व विविध कामगार संघटनेच्या प्रतिनिधीसोबत प्रकाशगड येथे झालेल्या बैठकीमध्ये श्री. बावनकुळे यांनी ही वेतनवाढ जाहीर केली.

या वेतनवाढीच्या करारामध्ये झालेल्या चर्चेत दि. ३१.०३.२०१८ च्या मूळवेतनामध्ये (Pre-Revised) ३२.५० टक्के पगारवाढीसोबत महाराष्ट्र शासनाप्रमाणे १२५ टक्के महागाई भत्ता मूळवेतनामध्ये समाविष्ट करण्यात येईल. तांत्रिक व अतांत्रिक सहाय्यक प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांच्या मानधनातही वाढ करण्यात आली असून आता त्यांना पहिल्या वर्षी १५ हजार, दुसऱ्या वर्षी १६ हजार तर तिसऱ्या वर्षी १७ हजार रुपये एवढे मानधन देण्यात येणार आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतनाशिवाय २० टक्के अतिरिक्त वाढ देण्यात येणार आहे. वर्ग ४ च्या तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनामध्ये ५०० रुपये वाढ करण्यात आलेली आहे. कर्मचारी अपघात विमा योजना व ग्रुप टर्म इन्शुरन्स विम्याची रक्कम १० लाखावरून २० लाखापर्यंत करण्यात आली आहे.


या बैठकीस ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, म.रा. वि.मं. सूत्रधारी कंपनीचे संचालक श्री. विश्वास पाठक, संचालक (वित्त) श्री. जयकुमार श्रीनिवासन, संचालक (मानव संसाधन) ब्रिगेडियर पी.के. गंजू (सेवानिवृत्त), महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अनिल कालेकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



*महापारेषण अपडेट*

६७३ अति उच्च दाब उपकेंद्रे कार्यान्वित



कामगार जगत

■ वीज कामगार व पदाधिकारी यांची मोठी उपस्थिती ■

# उस्मानाबाद येथे वर्कर्स फेडरेशनच्या मेळाव्याचे उद्घाटन

■ *टीम महापारेषण, उस्मानाबाद*

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या वतीने उस्मानाबाद येथे आयोजिलेल्या वीज कामगार मेळाव्याचे उद्घाटन महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे सरचिटणीस कॉम्रेड कृष्णा भोयर, संयुक्त सचिव कॉ. भीमाशंकर पोहेकर, कॉ. बी. एस. काळे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वर्कर्स फेडरेशन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित उस्मानाबादची २३ वी वार्षिक सर्वसाधारण यावेळी संपन्न झाली. मेळाव्याचे प्रास्ताविक कॉ. बी. एस. काळे यांनी केले. यावेळी सेवानिवृत्त पतसंस्था कर्मचारी, पदाधिकारी व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना श्री. अनंत पाटील म्हणाले, ``इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन ही संघटना कामगार हितासाठी लढणारी संघटना आहे. या संघटनेचे नेतृत्व हे अनुभवी व अभ्यासू आहे. संघटनेच्या लढाईचा इतिहास मोठा आहे. संघटना कायम कामगार हितासोबत वीज कंपन्या टिकविण्यासाठी सतत धडपड असते.'' कॉ. कृष्णा भोयर म्हणाले, ``वीज क्षेत्रात अनेक बदल होत आहेत. वीज कंपन्यांना स्पर्धेत टिकण्यासाठी सतत कामगार व अभियंते यांनी कठोर परिश्रम केले पाहिजे.''

शेवटी कॉ. अशोक शिंदे यांनी आभार मानले. मेळाव्याला वीज कामगार व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**उस्मानाबाद :** महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या वतीने आयोजिलेल्या वीज कामगार मेळाव्याचे उद्घाटन करताना महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, शेजारी सरचिटणीस कॉम्रेड कृष्णा भोयर, संयुक्त सचिव कॉ. भीमाशंकर पोहेकर, कॉ. बी. एस. काळे व अन्य मान्यवर.

संकटावर मात

■ पावसातही महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी घेतली मेहनत ■

# वसईत वीजपुरवठा सुरळीतपणे





■ *टीम महापारेषण, बोईसर*

बोईसर विभागीय कार्यालयांतर्गत कार्यरत असलेले १०० के. व्ही. उपकेंद्र, वसई येथे झालेल्या अतिपावसामुळे संपूर्ण केंद्र व कंट्रोल रूममध्ये पाणी शिरले असतानादेखील महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करून विद्युतपुरवठा सुरळीत केला.

यावर्षी सलग तीन वेळा वसई उपकेंद्र पाण्याखाली गेले होते. सुरक्षिततेचा उपाय म्हणून उपकेंद्राचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. दरम्यान, उपकेंद्रात पावसामुळे शिरलेले पाणी काढून टाकण्यास व उपकेंद्राचा पुरवठा पूर्ववत करण्यासाठी महापारेषण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री. महेश भागवत व बोईसर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. राजेश दखणे यांच्या मार्गदर्शनाखाली १०० के. व्ही. उपकेंद्र, वसई, २२० के. व्ही. उपकेंद्र, वसई व चाचणी विभाग, कळवा येथील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.



***महापारेषण अपडेट***

४७३९८ स.कि.मी. अ.उ.दा. वाहिन्या



केल्याने होत आहे रे...

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुढाकार ■

# चिंचवडमधील २२० के. व्ही. उपकेंद्रात नवीन पॅनल

■ *टीम महापारेषण, पुणे*

चिंचवड १ मधील २२० के. व्ही. उपकेंद्रात १९६७ पासून जुने असलेले ACDB पॅनल बदलून त्या ठिकाणी नवीन पॅनल तयार करून यार्डमध्ये बसविण्यात आले.

कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. नितीन ढवळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा बोरकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती मेघा कळसे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पॅनल बसविण्यात आला. यासाठी सुमारे दहा लाख रूपये खर्च प्रस्तावित होता. मात्र, महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी अवघ्या ९० हजार रूपयांत हा पॅनल बसविला आहे. त्यामुळे नऊ लाखांची बचत झाली आहे. याबद्दल अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

या कामासाठी श्री. विनायक सरोदे, श्री. सचिन ढाके, श्री. पुंजाजी पाटील, उपकार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा बांगर, प्रमुख कार्यदेशक श्री. प्रवीण जाधव, श्री. दीपक चौधरी यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**चिंचवड १ :** २२० के. व्ही. उपकेंद्र येथे १९६७ पासून जुने असलेले ACDB पॅनल बदलून त्या ठिकाणी नवीन पॅनल तयार करून यार्डमध्ये बसविले. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी वर्ग.

---

Power for All

■ महापारेषण कंपनीचा प्रथमच प्रयोग ■

# चिंचवड-१ येथे ५० एम.व्ही.ए. चे रोहित्र कार्यान्वित



**चिंचवड-१ :** येथे ५० एम. व्ही. ए. चे रोहित्र कार्यान्वित करण्यात आले. याप्रसंगी महापारेषण कंपनीचे अधिकारी.

■ *टीम महापारेषण, पुणे*

२२० के. व्ही. उपकेंद्र चिंचवड-१ येथे ५० एम.व्ही.ए.चे रोहित्र कार्यान्वित करण्यात आले. महापारेषण कंपनीच्या वतीने हा प्रथमच प्रयोग करण्यात आला आहे.

पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. वंदनकुमार मेंढे, चाचणी मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. जयंत कुलकर्णी, चाचणी मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. प्रमोद भोसले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. रवींद्र गुधाटे, उपकार्यकारी अभियंता श्री. राजेंद्र टेकाडे यांच्या चाचणी अहवालानुसार ५० एम.व्ही.ए. चे २२० के. व्ही./२२ के. व्ही. या रोहित्रासाठी रिऍक्टर (NGR) स्ट्रक्चरवर बसवून रोहित्र कार्यान्वित केले.

या कामासाठी पिंपरी-चिंचवड येथील कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. नितीन ढवळे, २२० के. व्ही. उपकेंद्र चिंचवड-१ च्या अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती मेघा कळसे, श्री. विनायक सरोदे, श्री. सचिन ढाके, श्री. पुंजाजी पाटील, उपकार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा बांगर, प्रमुख कार्यदेशक श्री. प्रवीण जाधव यांनी परिश्रम घेतले.

---



*महापारेषण अपडेट*

१२८२६५ एम.व्ही.ए. स्थापित क्षमता



# महापारेषणमध्ये ७३ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई*

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ७३ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच महापारेषणच्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.


प्रकाशगंगा येथील मुख्यालयात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी ध्वजारोहण केले. यावेळी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अनिल कालेकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, महाव्यवस्थापक (मा.सं., मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता नासीर कादरी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) मंगेश शिंदे, दक्षता अधिकारी बी. एम. पाटील, शिष्टाचार अधिकारी सतीश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक (मा. सं.) संदीप सुरवसे, श्यामसुंदर महिंद्रकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया.




**प्रकाशगंगा इमारत, मुंबई :** ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना वरिष्ठ अधिकारी वर्ग.



## *महापारेषण अपडेट*

एप्रिल-२०१९ पर्यंत ९९.५९ पारेषण प्रणाली उपलब्धता





**पडघे :** येथे आयोजिलेल्या चार दिवसीय शिबिराप्रसंगी महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री, सहाय्यक महाव्यवस्थापक डॉ. शीतल गेडाम व इतर अधिकारी.

### कर्मचाऱ्यांच्या कार्यकुशलतेमध्ये वाढ होणार

# पडघे येथे चार दिवसीय प्रशिक्षण शिबिर

*टीम महापारेषण, वाशी.*

महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या कार्यकुशलतेमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने स्थित प्रशिक्षण, संशोधन आणि विकास विभाग यांनी Central Board of Irrigation and Power (CBIP) संस्थेकडून `Maintenance of Line : Testing, Predictive maintenance, Earthling, Safety, Rules, Regulations, IS` या विषयावर पडघे येथे चार दिवसीय प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले.

कंपनीत काम करताना आंतरविभागीय कामकाजाची माहिती इतर विभागांच्या अधिकाऱ्यांना व्हावी, या हेतूने वित्त व लेखा विभागाची विविध कार्ये या विषयावर प्रशिक्षणाच्या दोन तुकड्या करण्यात आल्या. प्रशिक्षणाच्या उद्घाटनासाठी महापारेषणच्या महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता आणि महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे उपस्थित होते.

शिबिरात श्री. एस. एस. टकलकर आणि श्री. के. डी. कवैया यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. शिबिर यशस्वी करण्यासाठी केंद्राचे प्रमुख तथा अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शीतल गेडाम यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.



**चंद्रपूर :** सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांसाठी आयोजिलेल्या अभ्यासक्रमात मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता श्री. भाऊराव राऊत, मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. सतीश अणे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश सावंत व अन्य

### विद्युत सुरक्षा व संच मांडणी प्रमाणपत्र अभ्यासक्रम

# चंद्रपुरात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांसाठी उपक्रम

*टीम महापारेषण, नागपूर*

सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना रोजगार मिळावा, यासाठी महापारेषणच्या सीएसआर योजनेंतर्गत १२ आठवड्यांचे विद्युत सुरक्षा व विद्युत संच मांडणी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कृषीमंत्री डॉ. अनिल बोंडे, खासदार श्रीमती नवनीत राणा, महापारेषणच्या अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. भाऊराव राऊत, नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. सतीश अणे उपस्थित होते. अभ्यासक्रमानंतर बेरोजगार अभियंत्यांना लगेच पर्यवेक्षक आणि ठेकेदारीचा परवाना मिळणार आहे. त्यांना कोणत्याही अनुभवाशिवाय विद्युत कामाचे कंत्राट घेता येणार आहे. प्रशिक्षणार्थ्यांना विद्युत क्षेत्रातील तांत्रिक बाबींची माहिती, सुरक्षा व देखभाल यांची माहिती देण्यात आली.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०१९

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | वंदनकुमार दादाराव मेंढे | मुख्य अभियंता | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, पुणे | ११.०९.२०१९ |
| २. | सय्यद शाह मोहम्मद अल हक नासीर कादरी | मुख्य अभियंता | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, वाशी | ११.०९.२०१९ |
| ३. | श्रीमती जुईली मिलिंद वाघ | मुख्य अभियंता | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर | ११.०९.२०१९ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | विकास बळवंतराव बढे | मुख्य अभियंता | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, कराड | ३१.०८.२०१९ |
| २. | शमाकांत पु. वासेकर | अधीक्षक अभियंता | दूरसंचार व चाचणी मंडळ, औरंगाबाद | ३१.०८.२०१९ |
| ३. | रोहिदास फुलचंद पवार | अधीक्षक अभियंता | सांघिक कार्यालय | ३१.०८.२०१९ |
| ४. | सुभाष म. देसाई | अधीक्षक अभियंता | सांघिक कार्यालय | ३१.०८.२०१९ |

# Noting and Drafting

सार्वजनिक उपक्रमांमध्ये Noting and Drafting ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सर्व निर्णय सरकारी उपक्रमांत लिखाणाच्या माध्यमातून होत असतात. त्यामुळे लिखाणाला अतिशय जबाबदारीने हाताळायचे असते. Noting म्हणजे अधिकाऱ्यांनी कागदपत्रांवर केलेली टिप्पणी/शेरा व Drafting म्हणजे लेखनाचा कच्चा मसुदा. हा कच्चा मसुदा कोणत्याही स्वरूपात असू शकतो. उदा. कार्यालयीन टिप्पणी, पत्र, परिपत्रक, प्रशासकीय परिपत्रक, सूचना, संचालक मंडळाकरिता प्रस्तुत टिप्पणी, ठराव इत्यादी.



Noting करीत असताना सुवाच्च, स्पष्ट व संयुक्तिक Noting असणे अधिकाऱ्याची कार्यकुशलता दर्शविते. Noting चा दुसरा संदर्भ असाही असतो की, Note करणे म्हणजे दिलेले निर्देश/आदेश/सूचना लेखणीबंध करणे. यांचा अर्थ असा नाही की, Noting हा विषय Steno-Typist चा विषय आहे. किंबहुना ते जे करतात त्यास Dictation असे म्हणतात. या संदर्भातील Noting म्हणजे आपण लिहून ठेवलेले लेखन किंवा लिहावयास लागणारे लेखन. Noting सुध्दा फार स्वच्छ, सुवाच्च व स्पष्ट असणे गरजेची असते. त्यामुळे ते वाचणाऱ्या वर्गास सहज समजू शकते व त्यामुळे निर्णय प्रक्रियेस विलंब होत नाही. त्रुटी असलेल्या Noting मुळे बऱ्याच वेळा कार्यालयीन कागदपत्रे मागे-पुढे होतात. त्यामुळे बऱ्याच वेळा कार्यालयीन वेळ वाया जातो. त्यामुळे कित्येकदा चुकीचे निर्णयसुध्दा कदाचित होऊ शकतात. मग, अशा वेळेला आपल्याला जोडपत्र/शुध्दीपत्रक जारी करण्याची वेळ येते.

त्याकरिता प्रत्येकाने Noting/Drafting हा विषय समजून घेतला पाहिजे. अतिशय गुंतागुंतीचा, जटील विषयसुध्दा सुटसुटीत मांडता येतो. त्या विषयाचे चांगले ज्ञान प्राप्त केले असेल तर तो विषय कागदावर मांडण्यास सोपा होतो. म्हणून प्रथम विषयाचा चांगला अभ्यास होणे गरजेचा असतो. सरावाने किंवा अनुभवाने विषय कसा मांडावा, याची निपुणता आपल्यामध्ये येऊ शकते. त्याकरिता प्रत्येक कागदामध्ये आपण काय चुका केल्या त्याबद्दल जाणून घेऊन त्याबाबत अवलोकन करून त्यामध्ये सुधारणा आपल्याला करता आली पाहिजे. गुणग्राहकता जर आपल्यामध्ये असेल तर ते सहज सोपे असते. 'निंदकाचे घर असावे शेजारी' त्याप्रमाणे आपल्या चुका आपण शोधत राहिल्या पाहिजेत. त्यामुळेच आपण कालांतराने आपल्या लेखनात निपुणता आणू शकतो. जर आपण चुकांपासून काही शिकलो नाही किंवा त्या टाळल्या नाही तर आपल्याला लेखणाची निपुणता येणार नाही. तसेच लेखणाचे सौंदर्य वाढविण्याकरिता त्याला जोड लागते, ती भाषेची व भाषेला शब्द भांडाराची. त्याकरिता सतत वाचन, फक्त कार्यालयीन तर अवांतर वाचनसुध्दा आवश्यक आहे. त्यातून आपले शब्दभांडार वाढण्यास मदत होते. त्याबरोबरीला जर सुंदर हस्ताक्षराची जोड असेल तर फार चांगला अनुभव आपल्याला मिळतो. ''A Good Handwriting is a sign of Good Education. ''

प्रत्येकाने या संदर्भात आपली जिज्ञासा बाळगून हा विषय विकसित केला पाहिजे. सुसंवाद म्हणजे फार कमी शब्दांत मोठा संदेश देता येण्याची कला होय. मला आशा आहे, आपण सर्व या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यामध्ये निपुणता आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न कराल.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.